अधिक्षक दारुबंदी व उत्पादन शुल्क
रत्नागिरी
नंबर :- ३०९३
दिनांक :- १६/५/८९

<u>गोपनीय</u>

क्रमांक. बीपीए १०८९/१४/पीआरओ-२,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दिनांक एप्रिल १९८९.
26 APR 1989

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी.

विषय:- इ/एफएल-३ नमुन्यातील अनुज्ञप्त्या मंजूर करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी.

शासन गृहविभाग अधिसूचना क्रमांक. बीपीए १०८९/१-पीआरओ-२, दिनांक १७ फेब्रुवारी १९८९ अन्वये स्पेशल परमिट व लायसन्सेस रुल १९५२ मधील सुधारीत नियम ५ आणि मुंबई विदेशी दारु नियम १९५३ मधील सुधारीत नियम ४५ नुसार आपणाकडे प्राप्त झालेले इ/एफएल-३ नमुन्यातील अनुज्ञप्ती मंजूर करण्यासंबंधीचे अर्ज त्या करिता नियुक्त केलेल्या समितीपुढे विचारार्थ ठेवावयाचे असून समितीने केलेली शिफारस विचारात घेऊन जिल्हाधिका-यांनी आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर अनुज्ञप्ती मंजूर करावयाची आहे.

२. पुर्वी "इ"/एफएल-३ नमुन्यातील प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठवितान कोणकोणत्या बाबी तपासाव्यात याबाबत आपणास वेळोवेळी सूचना देण्यात आल्या होत्या. त्या सूचनांनुसार आताही अनुज्ञप्ती मंजुरीसाठी आलेले अर्ज विचारात घेताना तपासणी करणे आवश्यक आहे. मुंबई विदेशी दारु नियम १९५३ मधील सुधारीत नियम ४५[१] नुसार जिल्हाधिकारी यांनी त्यांचेकडील प्राप्त झालेले अर्ज नियम ४४-अ नुसार नियुक्त केलेल्या कमिटीपुढे विचारार्थ सादर करताना खालील बाबींची पुर्तता झाली आहे अगर कसे याबाबत माहिती समितीला देणे आवश्यक आहे. तसेच नियम ४५[१ अ] प्रमाणे अर्ज तपासून त्याची शिफारस करताना समितीनेही या बाबींची पुर्तता झाली आहे याची खात्री करून घ्यावी.

१] पोलीस नोंदणी अनुज्ञप्ती घेतली आहे.
२] एन्टरटेन्मेंट अनुज्ञप्ती घेतली आहे.
३] मुंबई दुकाने व संस्था कायद्यान्वये अनुज्ञप्ती घेतली आहे.
४] जागा हॉटेल मालकाच्या नावे असल्याबाबतचा पुरावा आहे.
५] जागा मालकीची नसल्यास, भाडेपावती व जागा मालकाची परवाना कक्षास हरकत नाही.

..२/-

६] ऐपतीचे प्रमाणपत्रं सादर केले आहे.

७] आयकर निपटारा प्रमाणपत्र/प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

८] विक्रीकर निपटारा प्रमाणपत्र/प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

९] हॉटेल/रेस्टॉरंट भागीदारीत असल्यास भागीदारी पत्राची प्रत.

१०] हॉटेल/रेस्टॉरंटचा दर्जा चांगला आहे.[नियम ४४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे].

११] खाद्यपदार्थांचे दरपत्रकाप्रमाणे खाद्यपदार्थ उपलब्ध आहेत व ग्राहकांना दिले जातात.

१२] रेस्टॉरंट/हॉटेलचा नियोजीत परवाना कक्षाचा नकाशा सादर केला असून त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे :-

[अ] मुख्य रेस्टॉरंटचे क्षेत्रफळ[परवाना कक्ष सोडून] परवाना कक्षाच्या क्षेत्रफळापेक्षा जास्त असावे.

[ब] परवाना कक्षाचे क्षेत्रफळ कमीत कमी १६ चौ. मीटर असावे.

[क] परवाना कक्ष पोटमाळ्यावर असल्यास त्यांची उंची कमीत कमी ६ फूट व ६ इंच असावी.

[ड] रेस्टॉरंट व परवाना कक्षात स्वतंत्र प्रसाधनगृहे असावीत.

[इ] परवाना कक्षात फक्त मुख्य रेस्टॉरंटमधूनच प्रवेश असावा.

१३] हॉटेलपासून ७५ मीटरच्या आत मान्यताप्राप्त शैक्षणिक व नोंदणीकृत धार्मिक संस्था, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाचा स्टॅण्ड/डेपो/स्टेशन व राज्य/राष्ट्रीय महामार्ग नसावा. [सदर अंतर मूळ उपहारगृहाच्या प्रवेशद्वारापासून ते संबंधित संस्थेच्या/बस डेपोच्या कंपाऊंडला असलेल्या प्रवेशद्वारापर्यन्त [गेट] मोजावयाचे आहे. राज्य/राष्ट्रीय महामार्गापासून हे अंतर अशा महामार्गाच्या सीमेपासून [मध्यापासून नव्हे] मोजावयाचे आहे. ]

१४] सदर ठिकाणी परवाना कक्ष दिल्यास जातीय किंवा इतर प्रकारच्या दंगली होण्याची शक्यता नाही असा पोलीसांचा दाखला द्यावा.

१५] हॉटेल सुरु झाल्याबाबत दाखला असावा.

१६] प्रस्तावित परवानाकक्ष देण्यासंबंधी काही तक्रारी आल्या असल्यास त्याबद्दल समितीने योग्य तो निर्णय द्यावा.

१७] उपहारगृह ज्या इमारतीत आहे त्या इमारतीचे बांधकाम अधिकृत असावे.

३. नियमांमध्ये अंतरनिर्बंध विषयक तरतूद नसल्याने कांही अर्जदार कोर्टात जाण्याची शक्यता आहे असे कांही जिल्हाधिकारी यानी कळविले आहे. तरी यासंबंधात आपले लक्ष स्पेशल परमीट व लायसन्सेस नियम १९५२ मधील सुधारीत नियम ५ [२ अ अ अ] आणि मुंबई विदेशी मद्य नियम १९५३ मधील सुधारीत नियम ४५[१ ब] कडे वेधण्यात येते. त्यामध्ये असे स्पष्ट नमुद केले आहे की कमिटीने शिफारस केल्यानंतर व राज्य शासन व आयुक्त, दारुबंदी व उत्पादन शुल्क यांच्या सूचना व तत्संबंधीत नियमातील तरतुदींनुसार आवश्यक बाबींची पुर्तता होत असल्यास जिल्हाधिकारी अनुज्ञप्ती मंजुर करु शकतात. सबब नियमांत अंतरनिर्बंधाबाबत तरतूद नसली तरी शासनाच्या व पूर्वीच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांवर बंधनकारक आहेत व या सूचनांना नियमाइतकेच महत्व आहे.

[ स. कृ. जांबवडेकर ]
सह सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.